*समृध्द किसान योजना*
*आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने कृषी समृध्दीच्या प्रक्रियेला मिळाली बळकटी*
============================================================

माजी अर्थमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने चांदा ते बांदा या योजनेअंतर्गत चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालय आणि टाटा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्‌यमाने समृध्द किसान योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सामुहीक सिंचन विहीर, सामुहीक विहीर दुरूस्ती, सामुहीक कुपनलिका यासह उस्मानाबादी बोकड वाटप, ठिबक सिंचन व आच्छादन योजना, मंडप शेती उच्च भाजीपाला लागवड, पॉलीहाऊस नर्सरी, कृषी अवजारे बँक हे उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत मुल तालुक्यातील 41, पोंभुर्णा तालुक्यातील 30 तर बल्लारपूर तालुक्यातील 17 गावांमधील 522 सामुहीक सिंचन विहीरींच्या प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली असून एकूण 1324 लाभार्थ्यांना सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

*सामुहीक सिंचन विहीर*
चांदा ते बांदा या योजनेअंतर्गत माजी अर्थमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी शेतक-यांच्या हिताचे विविध उपक्रम राबविले आहे. सामुहीक सिंचन विहीर योजनेअंतर्गत 522 प्रस्तावांसाठी 1983.60 लक्ष रू. निधी मंजूर करण्यात आला आहे. मे 2019 मध्ये योजनेची कामे सुरू करण्यात आली असून जून 2019 मध्ये 103 विहीरींची कामे पूर्ण करण्यात आली आहे व उर्वरित कामे जानेवारी 2020 पासुन सुरू करण्यात आली आहे.

*सामुहीक विहीर दुरूस्ती*
सामुहीक विहीर दुरूस्ती योजनेअंतर्गत 257 प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली असून 541 लाभार्थ्यांना या माध्यमातुन सिंचनाचा लाभ मिळणार आहे. यासाठी 128.50 लक्ष रू. निधी मंजूर करण्यात आला आहे. मे 2019 मध्ये सदर योजनेची कामे सुरू करण्यात आली असून उर्वरित कामे जानेवारी 2020 पासून सुरू करण्यात आलेली आहे.

*सामुहीक कुप नलिका योजना*

सामुहीक कुपनलिका योजनेच्या माध्यमातुन 23 प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली असून 64 लाभार्थ्यांना या माध्यमातुन सिंचनाचा लाभ मिळणार आहे. यासाठी 86.04 लक्ष रू. निधी मंजूर करण्यात आला आहे. जुन 2019 मध्ये सहा कुपनलिकांची कामे पूर्ण करण्यात आली असून उर्वरित कामे जानेवारी पासुन सुरू करण्यात आली आहे.

*उस्मानाबादी बोकड वाटप*

पशुसंवर्धनाच्या प्रक्रियेला गती प्राप्त व्हावी याद्दष्टीने उस्मानाबादी बोकड वाटप योजनेअंतर्गत 360 प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली असून 667 लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळणार आहे. यासाठी 30.87 लक्ष रू. निधी मंजूर करणयत आला आहे. आतापर्यंत 169 लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाला असून उर्वरित लाभार्थ्यांना टप्प्याटप्प्याने योजनेचा लाभ देण्यात येत आहे.

*ठिबक सिंचन व आच्छादन योजना*

ठिबक सिंचन आच्छादन योजनेअंतर्गत 417 प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली असून यासाठी 197.73 लक्ष रू. निधी मंजूर करण्यात आला आहे. जुन-जुलै 2019 मध्ये सदर योजनेची भौतिक कामे सुरू करण्यात आली असून 92 लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात आला आहे. उर्वरित लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यास सुरूवात करण्यात आली आहे.

*मंडप शेती उच्च भाजीपाला लागवड योजना*

मंडप शेती उच्च भाजीपाला लागवड योजनेअंतर्गत 509 प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली असून त्यासाठी 32.584 लक्ष रू. निधी मंजूर करण्यात आला आहे. 122 लाभार्थ्यांना आतापर्यंत योजनेचा लाभ देण्यात आला असून जुन-जुलै 2019 पासून सदर योजनेची कामे सुरू करण्यात आली आहे. उर्वरित लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देणे सुरू आहे.

*पॉली हाऊस नर्सरी*

पॉली हाऊस नर्सरी योजनेअंतर्गत एकूण 19 प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली आहे. त्याकरिता 61.20 लक्ष रू. निधी मंजूर करण्यात आला आहे. जुन-जुलै 2019 मध्ये सदर योजनेची भौतिक कामे सुरू करण्यात आली असून 2 लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. या योजनेमुळे सभोवतालील 4 ते 5 गावांमध्ये 120 ते 150 लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळणार आहे. उर्वरित कामांना सुरूवात करण्यात आली आहे.

*कृषी अवजारे बँक*

कृषी अवजारे बँक योजनेअंतर्गत 15 प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली असून त्याकरिता 212.79 लक्ष रू. निधी मंजूर करण्यात आला आहे. डिसेंबर 2019 मध्ये सदर योजनेची कामे सुरू करण्यात आली असून 15 गटांना योजनेचा लाभ देण्यात आला आहे. या योजनेमध्ये सभोवताली प्रत्येकी 4 ते 5 गावांमध्ये 250 ते 300 लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळणार आहे. उर्वरित कामांना सुरूवात करण्यात आली आहे.

शेतक-यांचे उत्पन्न वाढावे व प्रामुख्याने त्यांना सिंचनाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्या या उद्देशाने आ. सुधीर मुनगंटीवार यांनी राबविलेली समृध्द किसान योजना कृषी समृध्दीच्या प्रक्रियेला बळकटी देणारी ठरली आहे.